# प्रसिध्दीपत्रक

## १३००० सिंचन विहिर कार्यक्रम

नागपूर विभागातील 13000 सिंचन विहिरीच्या धडक कार्यक्रमाबाबत महाऑनलाईनद्वारे अर्ज भरण्याची प्रक्रिया दिनांक 26 फेब्रुवारी 2019 पासून सुरू होत आहे. खालील अटी व शर्ती पूर्ण करणा-या लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करण्यात यावे.

**योजनेची उद्दिष्टे-** दुष्काळावर कायम स्वरूपी उपाययोजना करण्याकरीता शास्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध् करून देणे.

**योजनेच्या अटी व शर्ती –** १) ज्या शेतक-याकडे त्यांच्या नावावर किमान ०.६० हे. जमिन असावी. कमाल मर्यादा नाही.

२) लाभार्थ्याची जमिन विहिरीसाठी तांत्रिकदृष्टया पात्र असणे आवश्यक आहे. (या संदर्भात भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी जागेची पहाणी करून अहवाल देणे.)

३) यापुर्वी अर्जदाराने विहिर,शेततळे, बोडी या घटकाचा शासकिय योजनामधून लाभ घेतला नसावा.

४) लाभार्थ्याकडे ०.६० हे. जमिन पेक्षा कमी जमिन असल्यामुळे, विहिर मंजूर करता येणार नाही. परंतू दोन अथवा तीन लाभार्थ्याची जमिन सलग असल्यास, सामुदायिक विहिरीची मागणी केली तर ते सामुदायिक रित्या विहिर मिळण्यास पात्र असतील.या सदंर्भात पाण्याचा वापर व पाण्याची हिस्सेदारी याबाबत संबंधित शेतक-यांनी रु १००/- च्या स्टॅम्प् पेपरवर करार करावा.

**लाभार्थ्याची निवड प्राधान्य-** लाभार्थ्याची निवड खालील प्राथमिकतेनूसार करण्यात येईल.

अ) ज्या कुटूंबामध्ये आत्महत्या झालेली आहे. त्यांचे वारसदार.

ब) दारिद्रय रेषेखालील (BPL) शेतकरी.

क) इतर लाभार्थी.

**अर्ज करण्याची पध्दती –** १) इच्छूक शेतक-याचे विहित नमूण्यातील अर्ज तथा संमती पत्र या कार्यक्रमासाठी अनिवार्य आहे. शेतक-यांनी त्यांची विहिरीची मागणी ऑनलाईन संगणकिय प्रणालीद्वारे भरावयाची आहे. यासाठी अर्जदाराने अर्ज http://aaplesarkar.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध् करून देण्यात आले आहे.

२) आपले सरकार पोर्टल - मागेल त्याला शेततळे - सिंचन विहिर - नविन युजर येथे नोंदणी करणे. पासवर्ड व आयडी तयार करून अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करणे. अर्जासोबत नमूना ७/१२, नमूना ८अ, लाभार्थ्याचे नावे असलेल्या बॅक खात्याची पुस्तिका, आधार कार्ड, यापुर्वी लाभ घेतला नसल्याचे प्रमाणपत्र मुळ प्रतित स्कॅन करून अपलोड करावे.

**आवश्य्क कागदपत्रे-** १) जमिनीचा ७/१२ व गांव नमूना ८ अ

२) दारिद्र रेषेखालील प्रमाणपत्र

३) आत्महत्या ग्रस्त् वारसदारानी सादर करावयाचे तहसिलदार याचे प्रमाणपत्र

४) राष्ट्रीयकृत बॅंकेत खाता उघडल्याचे पासबुकची छायांकित प्रत.आधार कार्डची प्रत.

५) यापुर्वी विहिर,शेततळे, बोडी या घटकाचा शासकिय योजनामधून लाभ घेतला नसल्याचे संबंधित गट विकास अधिकारी / तहसिलदार यांचे प्रमाणपत्र

**लाभार्थ्याची जबाबदारी -** १) सिंचन विहिर मंजूर झाल्यानंतर लाभार्थ्यास कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ३० दिवसाचे आत काम सुरू करून विहित कालावधीत पूर्ण करणे.

२) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी निश्चित केलेले जागेवर विहिरीचे बांधकाम पूर्ण करणे बंधनकारक राहील.

३) विहिरीचे काम लाभार्थ्यास मशिनद्वारे करण्याची मुभा राहील.

४) काम पूर्ण झाल्यावर ७/१२ च्या उता-यावर सिंचन विहिरीची नोंद घेणे बंधनकारक आहे.

५) विहिरीचे काम टप्पा टप्प्याने पूर्ण झाल्यावर झालेल्या कामाचे मुल्यांकनानुसार लाभार्थ्यास अनूदान देण्यात येईल. अनूदानाची एकूण कमाल मर्यादा रु २,५०,०००/- राहील.

**संपर्काचे स्थळ-** अर्जदारास अधिक माहितीसाठी पंचायत समिती स्तरावरील लघु पाटबधारे (जि.प.) उपविभागाचे कार्यालय, तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद गोंदिया येथील लघुपाटबंधारे विभागात संपर्क करता येईल.

जिल्हा जलसंधारण अधिकारी,
ल.पा.विभाग जि.प.गोंदिया